2 6 MAY 2022 पुण्यनगरी

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# दूरशिक्षण केंद्रातील त्रुटी दूर करणार

## - कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के

**कोल्हापूर :** शिवाजी विद्यापीठाच्या दूरशिक्षण केंद्रातील त्रुटी जाणून घेतल्या जात आहेत. त्या दूर करण्यात येत असून, त्यादृष्टीने समितीच्या माध्यमातून प्रक्रिया सुरू केली असल्याचे कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के यांनी सांगितले. तसेच परीक्षा व मूल्यमापन मंडळाचे संचालक, कुलसचिव मुलाखतीची प्रक्रिया दि. ३ जूनपासून सुरू होणार असल्याचेही त्यांनी सांगितले. कुलगुरू शिर्के म्हणाले, यूजीसीच्या नियमानुसार दूरशिक्षण केंद्राच्या मान्यतेबाबतच्या सर्व निकषांची पूर्तता केली होती; मात्र तरीही मान्यता मिळाली नाही. दूरशिक्षण केंद्राचा अधिक विकास करण्यासाठी त्याठिकाणी काही त्रुटी आहेत का, ते जाणून घेण्यासाठी समिती नियुक्त केली आहे. त्या समितीच्या दोन बैठका झाल्या आहेत. समितीचा अहवाल प्राप्त झाल्यानंतर पुढील कार्यवाही केली जाणार आहे. या वर्षी दूरशिक्षण केंद्रातील प्रथम वर्षाच्या प्रवेशाला यूजीसीची मान्यता मिळवण्यासाठी विद्यापीठाने अर्ज केला आहे.

26 MAY 2022 तरुण भारत

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# दूरशिक्षणच्या प्रथम वर्षाला यंदा मान्यता मिळणार

## कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के यांचा विश्वास : गतवर्षीच्या त्रुटींना जबाबदारांची चौकशी सुरु

प्रतिनिधी
कोल्हापूर

शिवाजी विद्यापीठातील दूरशिक्षण विभागाला पूर्णवेळ संचालक नसल्याने दूरशिक्षणची मान्यता युजीसीने नाकारली होती. त्यामुळे विद्यापीठाने व्यवस्थापन परिषदेच्या मान्यतेने पूर्णवेळ संचालकांची नियुक्ती केली आहे. गतवर्षीच्या अन्य त्रुटींची पुर्तता केली आहे, विद्यापीठ अनुदान आयोगाने अर्ज भरण्याचे परिपत्रक काढल्यास शिवाजी विद्यापीठ दूरशिक्षण पदवी प्रथम वर्षाच्या मान्यतेसाठी अर्ज भरणार आहे. त्यामुळे यंदा दूरशिक्षणच्या पदवी प्रथम वर्षाला मान्यता मिळेल, असा विश्वास कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के यांनी व्यक्त केला.

कुलगुरू डॉ. शिर्के म्हणाले, विद्यापीठ



- मान्यतेसाठी त्रुटी सुधारून नव्याने अर्ज दाखल करणार
- नव्या वर्षातील पदवी प्रथम वर्षाला मान्यता मिळणार

स्थापनेपासून दूरशिक्षणला पूर्णवेळ संचालक पद दरवर्षी भरले जाते. परंतु जाहीरात काढलेली नव्हती. विद्यापीठ अनुदान आयोग (युजीसी) ने चालू शैक्षणिक वर्षात नवीन नियम लागू करीत, पदवी प्रथम वर्षाची मान्यता रद्द केली. परंतु दूरशिक्षणच्या सर्व विद्यार्थ्यांना सर्व कॉलेजमधील नियमित वर्गात प्रवेश दिला. त्यामुळे विद्यार्थ्यांचे नुकसान झाले नाही. यंदाच्या शैक्षणिक वर्षात पदवी प्रथम वर्षाला मान्यतेसाठी जून-जुलैमध्ये ऑनलाईन अर्ज भरावा लागेल. त्याची स्फुटणी करून त्रुटींची पुर्तता करण्याच्या सूचना केल्या जातील. त्यानंतर 'युजीसी'कडून नवीन शैक्षणिक वर्षातील पदवी प्रथम वर्षाला मान्यता मिळणार आहे.

विद्यापीठाने दूरशिक्षणला संचालक, पूर्णवेळ उपकुलसचिव आणि शिक्षकांची नियुक्ती केली आहे. युजीसीच्या अटींची पुर्तता केल्यामुळे यंदाच्या शैक्षणिक वर्षात पदवी प्रथम वर्षाला मान्यतेसाठी प्रयत्नशील आहे. विद्यापीठाला नॅकचे एप्लसप्लस मानांकन असल्याने विद्यापीठाने कॅटेगिरी वनसाठी युजीसीकडे प्रस्ताव पाठवला आहे. त्याला मंजुरी मिळाल्यानंतर दूरशिक्षणला मान्यता घेण्याची गरज नाही, असेही त्यांनी सांगितले.

### दोषींची चौकशी सुरू

गतवर्षी दूरशिक्षण विभागाच्या पदवी प्रथम वर्षाला ज्यांच्यामुळे मान्यता मिळालेली नाही. काहींनी दूरशिक्षणबद्दल गैरसमज पसरवले. या सर्व प्रकाराला कारणीभूत असलेल्या अधिकारी, कर्मचाऱ्यांची चौकशी सुरू असल्याची माहिती त्यांनी दिली.

तरुण भारत

# विधी विभागाच्या परीक्षा ऑफलाईनच होणार

- लॉ कॉलेजचे प्राचार्य, विद्यार्थ्यांच्या बैठकीत कुलगुरू डॉ. शिर्के यांची घोषणा

प्रतिनिधी
कोल्हापूर

विधी विभागाच्या परीक्षा ऑफलाईन घ्या, या मागणीसाठी विधी विभागाच्या विद्यार्थ्यांनी विविध प्रकारचे आंदोलन केले. याची दखल घेत कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के यांनी लॉ कॉलेजचे प्राचार्य आणि विद्यार्थ्यांची बैठक घेतली. या बैठकीत विधी विभागाच्या परीक्षा ऑफलाईन घेण्याचा निर्णय घेण्यात आला.

कोरोनानंतर सर्व परीक्षा ऑफलाईन पद्धतीने घेण्याची घोषणा उच्च व शिक्षण मंत्री उदय सामंत यांनी केली. त्यानुसार शिवाजी विद्यापीठाने सर्वच परीक्षा ऑफलाईन घेण्याचा निर्णय घेतला. परंतू विधी विभागाच्या परीक्षा ऑनलाईन घ्याव्यात या मागणीसाठी विद्यार्थी आग्रही होते. परीक्षेसाठी वेळ वाढवून दिली जाणार आहे. तसेच एका प्रश्नाला दहा प्रश्नांची 'क्वश्चन बँक' दिली जाणार आहे. त्यामुळे परीक्षा देणे सोपे जाणार आहे. यासंदर्भात सविस्तर माहिती प्राचार्य आणि विद्यार्थ्यांच्या बैठकीत देऊन विद्यार्थ्यांचे गैरसमज दूर केले आहेत. त्यामुळे विधी विभागासह विद्यापीठाच्या सर्वच परीक्षा ऑफलाईन होणार आहेत.

लोकमत

# विद्यापीठात महाराणा प्रताप सिंह जयंती

कोल्हापूर : शिवाजी विद्यापीठात महाराणा प्रताप सिंह यांची जयंती बुधवारी उत्साहात साजरी केली. विद्यापीठाच्या मुख्य प्रशासकीय भवनमध्ये कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के, प्र-कुलगुरू डॉ. पी. एस. पाटील यांच्या हस्ते महाराणा प्रताप सिंह यांच्या प्रतिमेला पुष्पहार अर्पण करून अभिवादन केले. यावेळी प्रभारी कुलसचिव डॉ. व्ही. एन. शिंदे, विद्यार्थी विकास विभागाचे संचालक प्रा. डॉ. आर. व्ही. गुरव, आजीवन अध्ययन व विस्तार विभागाचे प्रभारी संचालक प्रा. डॉ. ए. एम. गुरव, प्रशासकीय कर्मचारी उपस्थित होते.

पुण्यनगरी

# विद्यापीठात महाराणा प्रतापसिंह जयंती

**कोल्हापूर :** शिवाजी विद्यापीठात महाराणा प्रतापसिंह यांची जयंती उत्साहात साजरी करण्यात आली. शिवाजी विद्यापीठाच्या मुख्य प्रशासकीय भवनामध्ये कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के, प्र-कुलगुरू डॉ. पी. एस. पाटील यांच्या हस्ते महाराणा प्रतापसिंह यांच्या जयंतीनिमित्त प्रतिमेस पुष्पहार अर्पण करून अभिवादन करण्यात आले. यावेळी प्रभारी कुलसचिव डॉ. व्ही. एन. शिंदे, विद्यार्थी विकास विभागाचे संचालक प्रा. डॉ. आर. व्ही. गुरव, आजीवन अध्ययन व विस्तार विभागाचे प्रभारी संचालक प्रा. डॉ. ए. एम. गुरव आदी उपस्थित होते.

लोकमत

# 'पंजाब'च्या संस्कृतीचे उद्या दर्शन घडणार

## लव्हली युनिव्हर्सिटीच्या विद्यार्थ्यांचा दौरा

लोकमत न्यूज नेटवर्क,

**कोल्हापूर** : आजादी का अमृतमहोत्सव आणि शिवाजी विद्यापीठाच्या हीरक महोत्सवनिमित्त विद्यापीठामार्फत सांस्कृतिक आदानप्रदान उपक्रम आयोजित केला आहे. त्याअंतर्गत पंजाबमधील लव्हली प्रोफेशनल युनिव्हर्सिटीच्या विद्यार्थ्यांचा संघ शुक्रवार (दि.२७) पासून पाच दिवसाच्या कोल्हापूर दौऱ्यावर येणार आहे. हे विद्यार्थी पंजाबच्या संस्कृतीचे दर्शन घडविणार आहेत, अशी माहिती कुलगुरू डॉ. डी.टी. शिर्के यांनी मंगळवारी येथे पत्रकार परिषदेत दिली.

लव्हली युनिव्हर्सिटीच्या ५१ विद्यार्थ्यांचा संघ शुक्रवार ते मंगळवार (दि.३१) दरम्यान शिवाजी विद्यापीठात येणार आहेत. कोल्हापूरच्या माध्यमातून हे विद्यार्थी महाराष्ट्राची संस्कृती समजून घेतील. कोल्हापुरातील कणेरी मठ, न्यू पॅलेस, भवानी मंडप, अंबाबाई मंदिर, रंकाळा तलाव, आदी ठिकाणी ते भेट देतील. त्यासह 'महाराष्ट्र के रंग; पंजाब के संग' याअंतर्गत पंजाबची लोकसंस्कृती, लोकनृत्य, लोकगीते, पारंपरिक कला प्रकारांचे ते विद्यापीठात सादरीकरण करणार असल्याचे कुलगुरू डॉ. शिर्के यांनी सांगितले. विद्यापीठ पातळीवर अशा पद्धतीने सांस्कृतिक कार्यक्रम पहिल्यांदाच होत आहे. विद्यापीठातील राजमाता जिजाऊसाहेब सभागृहामध्ये दि. ३० आणि ३१ मे रोजी पंजाबचे विद्यार्थी सांस्कृतिक कार्यक्रम सादर करणार असल्याचे विद्यार्थी विकास विभागाचे संचालक डॉ. आर.व्ही. गुरव यांनी सांगितले.

### महाराष्ट्र के रंग; पंजाब के संग...

लव्हली युनिव्हर्सिटीच्या विद्यार्थ्यांचे शुक्रवारी रात्री आठ वाजता विद्यापीठात आगमन होईल, शनिवारी कोल्हापुरातील विविध पर्यटनस्थळांना विद्यार्थी भेट देतील. रविवारी ते विद्यापीठात रंगीत तालीम करतील. सोमवारी दुपारी तीन वाजता महाराष्ट्र के रंग; पंजाब के संग या कार्यक्रमाचे उद्घाटन होईल, मंगळवारी दुपारी तीन ते सायंकाळी सहा यावेळेत सांस्कृतिक कार्यक्रम होणार आहे. त्यात लोकनृत्य, कव्वाली, भांगडा, एकपात्री, आदी विद्यार्थी सादर करतील. शिवाजी विद्यापीठाचा संघ महाराष्ट्राची लोकधारा, मूकनाट्य, देशभक्तीपर लघुनाटिका सादर करणार असल्याचे डॉ. गुरव यांनी सांगितले.